# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

दूरध्वनी कमांक :0712-2565403/2560209/2553401/2553360 FAX NO.0712-2561775, www.nagpureduboard.in

विभागीय अध्यक्ष: 2560319/2562766 Email ID : msboardnagpur@gmail.com विभागीय सचिव: 2560319/2560166


पत्र कमांक / नाविमं / पमा / 930
दिनांकः 04 /05 / 2020

प्रति,

मा. संचालक
माहिती व जनसंपर्क अधिकारी,
जुने सचिवालय, सिव्हिल लाईन्स, नागपूर.

विषयः– माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षेस सन 2019–20 मध्ये प्रविष्ठ होणा–या विदयार्थ्यांना सवलतीच्या वाढीव गुणासाठीचे प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत.

संदर्भः– क.रा.म./पराक्षा–7/2504 व 2505 दिनांक – 30/04 /2020.

महोदय,

आपणास कळविण्यात येते की मार्च - 2020 मध्ये घेण्यात येणा–या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रणामपत्र (इ.12 वी) परीक्षेस प्रविष्ठ होणा–या खेळाडू विदयार्थ्यांना,एन.सी.सी. ,स्काऊट गाईड मधील विदयार्थ्यांना तसेच इ.१० वी शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रकारात सहभागी होणा–या विदयार्थ्यांना सवलतीच्या वाढीव गुणासाठीचे प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबतचे प्रकटन सोबत जोडले आहे.

सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दुरदर्शन केंद्रांनी बातम्याचे वेळी तात्काळ विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.

(रविकांत देशपांडे)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर

सहपत्रः–प्रकटनाची प्रत

1) प्रति, सचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, शिवाजीनगर,पुणे–4 यांना माहितीस्तव.
2) प्रति, शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग नागपूर यांना माहितीस्तव समादराने अग्रेषित.
3) प्रति, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. भंडारा, चद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील माध्यमिक शाळा यांच्या लेखी निदर्शनास आणून द्यावे.
4) .प्रति, मा. संचालक, आकाशवाणी केंद्र नागपूर यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या आकाशवाणी केंद्रावरुन बातम्याचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
5) प्रति, मा. संचालक, दूरदर्शन केंद्र नागपूर, यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या दूरदर्शन केंद्रावरुन बातम्याचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती. मा. संपादक, दै..... ..........................................................यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या वृत्तपत्रातून तात्काळ विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
7) मुख्याध्यापक, सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा, नागपूर विभाग, नागपूर यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनानुसार कार्यवाही करावी.

karwade

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

# प्र क ट न

**विषय-** माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस सन २०१९-२० मध्ये प्रविष्ठ होणा-या विदयार्थ्यांना सवलतीच्या वाढीव गुणासाठीचे प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचे संलग्न असलेल्या सर्व माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक व कनिष्ठ महाविदयालयाचे प्राचार्य,शिक्षक, विद्यार्थी व पालक आदींना सूचित करण्यात येते की, शासन निर्णय दिनांक २०/१२/२०१८ नुसार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र(इ.१२वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना सवलतीच्या वाढीव गुण देण्याबाबतचे प्रस्ताव विभागीय मंडळाकडे सादर करण्याची निर्धारित मुदत ३० एप्रिल पर्यंत देण्यात आली होती

शासनाने दिनांक १६/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये मार्च २०२० मध्ये माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या व शासकीय रेखाकला परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांना सवलतीच्या वाढीव गुण देण्याबाबत संबंधित शाळेकडे प्रस्ताव विहित नमुन्यात दि.१५ फेब्रुवारी, २०२० पर्यंत सादर करणे व संबंधित शाळांनी दि.२५ फेब्रुवारी, २०२० पर्यंत संबंधित विभागीय मंडळ कार्यालयास शिफारशींसह सादर करण्याबाबत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

तथापि केंद्र व राज्य शासनद्वारा कोरोना विषाणू (कोविड-१९)या साथीच्या संसर्गजन्य आजारामुळे दि.२१ मार्च २०२० पासून राज्यात व देशभरात दि.३ मे २०२० पर्यंत संचारबंदी जाहीर केली असल्याने अनेक खेळाडू विदयार्थ्यांचे प्रस्ताव संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांना सादर करणे शक्य झालेले नाही. यामुळे अनेक पात्र खेळाडू क्रिडा गुण सवलतीपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झालेली आहे.

त्यामुळे शासनाच्या शासन निर्णय क्र.उमाशी २०२०/प्र.क्र. ६२/एसडी-२ मंत्रालय, विस्तार इमारत, मुंबई-३२ दिनांक २९ एप्रिल,२०२० अन्वये संबधित शाळा/कनिष्ठ महाविदयालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांना खेळाडू विद्यार्थ्यांचे परिपूर्ण प्रस्ताव विहित नमुन्यात दि.१३ मे २०२० पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडे सादर करण्यास व संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी प्राप्त प्रस्तावांची छाननी करून दि.२० मे २०२० पर्यंत संबंधित विभागीय मंडळ कार्यालयास शिफारशींसह सादर करण्यास मुदतवाढ दिलेली आहे. तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईड मधील विद्यार्थी व शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांचे सवलतीचे अतिरिक्त गुण मिळण्याकरिताचे प्रस्ताव विद्यार्थ्यांनी शाळांकडे दिनांक १३ मे २०२० व माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळांकडे दिनांक २० मे २०२० पर्यंत सादर करण्यास मान्यता दिलेली आहे. सदर शासन निर्णय केवळ सन २०१९-२० या एका शैक्षणिक वर्षाकरिता लागू राहिल.

तरी मार्च २०२० माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र(इ.१२वी) परीक्षेस प्रविष्ठ सर्व खेळाडू, एन.सी.सी., स्काऊट गाईड तसेच शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविण्याऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणारे विद्यार्थी, त्यांचे पालक, शिक्षक, मुख्याध्यापक, प्राचार्य, सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविदयालय यांनी नोंद घेऊन त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी. कोणताही पात्र विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची सर्व शाळा व कनिष्ठ महाविदयालय प्रमुखांनी दक्षता घ्यावी.

(डॉ अशोक भोसले)
सचिव
राज्य मंडळ, पुणे-०४

दिनांक ३०/४/२०२०